नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/01/2023 (शनिवार) सायंकाळ

---

# खापरखेडा थर्मल पॉवर स्टेशन येथे दहशतवादी हल्ला.

## (दहशतवादी हल्ल्यांचे प्रत्युत्तर देण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस सुरक्षा यंत्रणेचे सुसज्जते बाबतचे प्रात्यक्षीक)

दि. २८/०१/२०२३ रोजी खापरखेडा थर्मल पॉवर स्टेशन ५०० मेगावॅट येथील सर्व्हीस बिल्डींग मध्ये ०३ दहशतवादी यांनी शिरकाव करुन पॉवर स्टेशन येथील काही कर्मचाऱ्यांना बंधक केल्याची खळबळजनक माहिती खापरखेडा पोलीसांना मिळाली. त्यावरुन खापरखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रविण मुंढे यांनी या घटनेची माहिती तातडीने वरिष्ठांना देवून जिल्हयाचे नियंत्रण कक्षास दिली. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांनी क्षणाचाही विलंब न लावता जिल्हयातील सुरक्षा यंत्रणेस अलर्ट जारी करुन या घटनेचे नेतृत्व स्वत: केले व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांना खापरखेडा येथे सशस्त्र सुरक्षा यंत्रणेस पाचरण करण्याचे निर्देश दिले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून नियंत्रण कक्षाची कमान श्री संजय पुरंदरे, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) नागपूर ग्रामीण यांनी आपले हाती घेतली व नियंत्रण कक्षाने विनाविलंब जिल्हा सुरक्षा यंत्रणेशी समन्वय साधून नागपूर ग्रामीण पोलीस दलातील ATB पथक, ATS पथकए शिघ्र कृती दल (QRT), स्पेशल टास्क फोर्स, RCP पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेचे पथक, विशेष शाखेचे पथक, आर्थीक गुन्हे शाखा, बिनतारी संदेश विभाग, फॉरेन्सीक तज्ञांचे पथक तसेच प्रादेशिक न्यायसहाय्यक प्रयोगशाळेचे पथक घटनास्थळी पाठविले. याचबरोबर पोलीस स्टेशन, खापरखेडा, खापा, कन्हान, पारशिवनी, मौदा, कळमेश्वर, सावनेर येथून अतिरिक्त पोलीस कूमक मागवून त्यांची विवीध पथके घटनास्थळी पाठविले. घटनेची माहिती कन्हान, रामटेक आणि नागपूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांना मिळाल्याने ते सुध्दा आपले पथकांसह खापरखेडा येथे हजर आले. घटनास्थळी ॲम्बुलन्स व अग्नीशामन दल यांना सुध्दा पाचरण करण्यात आले. पहाताक्षणी खापरखेडा थर्मल पॉवर स्टेशन परिसराला छावणीचे स्वरुप आले.

थर्मल पॉवर स्टेशन येथे नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी पॉवर स्टेशनचे आत शिरकाव केलेल्या दहशतवाद्यांशी निगोसिएशन करण्याकरीता व त्यांची मागणी काय? यासंबधात आर्थीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजेन्द्र निकम यांचे पथकास निर्देश दिले. त्यानुसार दहशतवादी यांनी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे बंधीस्थ त्यांचे साथीदारांना सोडण्याची मागणी केली. परंतु निगोसिएशन पुर्ण होण्यापुर्वीच दहशतवाद्यांनी पोलीसांचे दिशेने एक हॅन्डग्रेनेड फेकून हल्ला केला. सुदैवाने यामध्ये कोणीही जखमी झाले नाही. परिनामी स्पेशल फोर्सच्या जवानांनी काऊंटर फायरिंग सुरु केली. यामध्ये दोन दहशतवादी जखमी झाले व एका दहशतवाद्यास कंठस्नान प्राप्त झाले. दोन्ही जखमी दहशतवाद्यांना स्पेशल फोर्सच्या जवानांनी ताब्यात घेतले व थर्मल पॉवर स्टेशन येथील बंधक कर्मचाऱ्यांची सुटका केली. अश्याप्रकारे दहशतवादी हल्लयाची थरारक घटना खापरखेडा येथे आज रोजी पहाटे १०.१५ वाजता घडली. दहशतवादी हल्ल्याचे प्रतिउत्तर देण्याकरीता जिल्हा नियंत्रण कक्षाव्दारे पाचारण करण्यात आलेली पोलीस सुरक्षा यंत्रणा अल्प कालावधीतच वेळ १०.३० वा. ते १०.४५ वाजता दरम्यान घटनास्थळी दाखल झाली. दहशतवादी यांचेशी लढण्याची कार्यवाही दुपारी १२.३० वाजता पर्यंत पार पाडली, या प्रात्यक्षीकतेतून नागपूर ग्रामीण पोलीस दलाची सुरक्षा यंत्रणा दक्ष व सुसज्ज असल्याचे दिसून आले व सदरचे प्रात्यक्षीक समाधानकारकरित्या पार पाडले.

वास्तविक नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांनी वरील प्रात्यक्षीक केवळ जिल्हयातील सुरक्षा यंत्रणेच्या सुसज्जतेची तपासणी करण्याकरीता आयोजीत केले. या प्रात्यक्षीक मध्ये पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, श्री संजय पुरंदरे, पोलीस उपअधीक्षक गृह यांचेसह ०३ पोलीस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी, १० पोलीस निरीक्षक, ०४ सहा. पोलीस निरीक्षक, ०६ पोलीस उपनिरीक्षक आणि १५० पोलीस कर्मचारी सहभागी झाले.








28- 1-2023
11:24:51

## पोलीस स्टेशन काटोल येथील घरफोडीचा गुन्हा उघड

## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक १४/०१/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक १५/०१/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—ज्ञानेश्वर यामरावदेव दुंदे, वय ५५ वर्ष, रा. शिर्साबाडी ता.काटोल ह.मु. नबीरा ले आउट पंचवटी काटोल हे आपले पंचवटी येथील घरी गेले असता व घराचे छतावरील खोलीचे लाकडी दरवाज्याचे कुलुप डघडण्यास गेले असता लाकडी दरवाज्याचे कुलुप तुटलेला दिसला फिर्यादीने आतमधे जावुन पाहीले असता फिर्यादीचा ॲसुस कंपनीचा लॅपटॉप जुना व जुना वापरता १६ जीबी सॅन्डीक्स कंपनीचा पेनड्राईव्ह चोरून नेल्याचे पोस्टे काटोल येथे अप. क्र. 35/23 कलम 454, 380, 457 भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने सुरू केला. तपासा दरम्यान वरूड जि. अमरावती येथे राहणारा येगेश तायडे याने त्याचे दोन साथीदारासह चोरी केल्याची समजल्याने स्टाफसह वरूड येथे जावुन योगेश उर्फ नागेश सुभाष तायडे, वय 28 वर्ष, रा. दही गल्ली वरूड हयास ताब्यात घेवुन सखोल विचारपूस केली असता त्याने त्याचे मित्र नामे संकेत भोरे व विधीसंघर्ष बालक दोन्ही रा. शहापूर वरूड सोबत काटोल परीसरातील पंचवटी येथून लॅपटॉप पेन ड्राइव चोरी केल्याचे सांगितल्याने त्याचे ताब्यातून 1) ASUS कंपनीचे लॅपटॉप किमती अंदाजे १०,०००/—रू. २) sandisk कंपनीचे १६ जीबी पेन ड्राइव किमती अंदाजे २००/—रू. असा एकुण १०,२००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केले. यातील दोन्ही आरोपीचा शहापूर येथे जावून शोध घेतला असता संकेत ज्ञानेश्वर भोरे हा मिळुन आला नाही. विधीसंघर्ष बालक हा मिळुन आला. तो विधीसंघर्ष बालक असल्याने त्यास त्याचे आईचे ताब्यात देवून सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

आरोपीची वैद्यकीय तपासणी करून आरोपी योगेश तायडे हयास ताब्यात घेतले. बाबत त्योच आईला लेखी सुचनापत्र दिले. आरोपीस व जप्त मुद्देमाल पुढील तपासकामी पोस्टे काटोल यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार निलेश बर्वे, दिनेश अधापुरे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर